# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ५०२/२०२२

**तक्रारकर्ता,** श्रीमती तृप्ती जयहिंद पाटील,
मु.पो.विनायक (डोंगरआळी), केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : २/४/२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४/१/२०२२ | ---- | ४/३/२०२२ | २८/३/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.५/७/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २/४/२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी श्री.प्रमोद मधुकर मुकुंदे, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव उपस्थित व तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, सध्या कार्यरत-ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती खालापूर अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

" *पर्यावरण प्रदुषण, ग्रामस्थांच्या आरोग्याबाबत व शासनाची फसवणूक केल्याबाबत अर्ज दि.५/११/२०१९, दि.१५/३/२०२१, स्मरणपत्र दि.२८/५/२०२१, दि.२३/६/२०२१, दि.३०/८/२०२१ सरपंच/ग्रामसेवक ग्रुप ग्रा.पं.केगाव यांस. १) उपरोक्त विषयान्वये दिलेल्या अर्ज व स्मरणपत्रानुसार केलेल्या कारवाईच्या प्रती माहिती अधिकारात मिळाव्यात. २) उपरोक्त सर्व अर्ज व स्मरणपत्रानुसार अर्जदारास दिलेला अहवाल/उत्तराच्या प्रती सहि शिक्यानिशी सत्यप्रत करुन मिळाव्यात."*

तद्नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२८/३/२०२२ रोजी, *“जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील ग्रामविकास अधिकारी यांनी या आदेशाच्या तारखेपासुन आजच अपीलकार यांना माहिती पुरवावी.”* असा निर्णय दिलेला आहे.

तक्रारकर्ता यांनी निवेदन केले की, त्यांना अद्यापावेतो माहिती प्राप्त झालेली नाही.

विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी निवेदन केले की, तक्रारकर्ता यांनी ज्या अर्जाच्या संदर्भात माहितीची मागणी केली आहे. ते अर्ज त्यांचे कार्यालयात आढळून येत नाही. त्यामुळे ही माहिती तक्रारकर्ता यांना पुरविता आली नाही.

तक्रारकर्ता यांनी सदर अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात सादर केलेबाबत ग्रामपंचायत कार्यालयाचा दिनांकासहित असलेल्या शिक्क्याची प्रत सादर केली. त्यावरून त्यांनी सदर अर्ज ग्रामपंचायतीकडे दिलेले आहेत हे स्पष्ट होते.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. उपरोक्त विवेचनात नमूद परिस्थितीत सदर अर्ज ग्रामपंचायत कार्यालयात आढळून येत नसल्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यासाठीची जबाबदारी निश्चित करावी व यासंदर्भात जी वस्तुस्थितीदर्शक माहिती असेल ती तक्रारकर्तास १५ दिवसात समक्ष विनामूल्य पुरवावी.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४/१/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशांनतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१२/५/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

(शेखर चन्ने)
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ एप्रिल २०२६ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.वैभव बाळकृष्ण पाटील, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रुप ग्रामपंचायत केगाव **– यांना प्रत**
-- विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय केगांव,
ता.उरण, जि.रायगड ४०० ७०२. **यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)